# 2. भारताचे हनुमान

कार्यक्षमतेच्या बाबतीत मला भारतीय नेहेमीच प्रभावित करतात. पहिला आश्चर्याचा धक्का मला तेव्हा बसला जेव्हा मी प्रायोगिक तत्वावर संगणक कार्यालयात लावला. एका कर्मचाऱ्याने 25 पाने एका दिवसात टाइप करून दिली, त्यावेळी कर्मचारी दररोज 5-6 पाने टंकलेखन करून देत असे. मला वाटले हा अपवाद असावा किवा त्या कर्मचाऱ्याची विशेष कार्यशैली असावी. पण जेव्हा मी पीजीपी विध्यार्थी संख्या 35 वरुन 105 वर नेली आणि गैर शिक्षणं कर्मचारी संख्या तेवढीच ठेवली, प्रत्येक विभागात डुप्लीकटींग रूम, विध्यार्थी कल्याण कार्यालय, प्लेसमेंट, पीजीपी, ग्रंथालय आणि अक्कौंट्स कार्यालयात कार्यभार जवळ जवळ तीन पटीत वाढला होता. शिक्षकाच्या संख्येत ही (22 वरून 24) खूपच नगण्य वाढ केली होती.

जेव्हा मी आयआयएम कोझिकोडेला गेलो, तेव्हा तिथे गैर शिक्षणं कर्मचारी संख्या 30 होती आणि पीजीपी विध्यार्थी संख्या 60. नंतर पीजीपी विध्यार्थी संख्या 120,180 आणि 260 झाली तरीही गैर शिक्षणं कर्मचारी संख्या तीसच होती. त्यामुळे माझ्या हे लक्षात आले की 30 गैर शिक्षणं कर्मचाऱ्यांची कार्यकुशलता 260 विध्यार्थी असले तरीही चालू शकते. आणि काहीशी हीच परिस्थिति प्राध्यापकांच्या बाबतीत देखील आहे. मी आयआयएम कोझिकोडेला गेलो, तेव्हा प्राध्यापक संख्या 20 होती. ही संख्या 24 झाली जेव्हा विध्यार्थी संख्या 120 झाली. आणि 28 प्राध्यापक 260 विध्यार्थी झाले तेव्हा होते. त्याच बरोबर ही प्राध्यापक मंडळी 240 ऑनलाइन कार्यक्रमाच्या विद्यर्थ्यांना, एमडीपी कार्यक्रम , कॉन्फ्रेंस अश्या सर्व ठिकणी आपले कौशल्य दाखवत होती.

मग मला हे समजत नाही की हे मनुष्यबळ आधी त्यांच्या कार्यक्षमतेपेक्षा कमी प्रमाणात वापरले जात होते का? किवा हे सर्व हनुमानासारखे असावेत. ह्यांच्या शक्तीची ह्यांना जाणीव करून देण्याची काळजी हेच आजच्या नेतृत्वा पुढचे आणि एचआरडी पुढचे आव्हान असावे.